# मुद्दा क्र. ३

**निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, पर्यवेक्षण, उत्तरदायित्व प्रणाली:**

## कलम ४ (१) (b) (iii)

**निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, पर्यवेक्षण,उत्तरदायित्व प्रणाली:**

वैद्यकिय मुख्य कार्यालयाकडील प्रशासकिय कामाच्या नस्ती व आर्थिक कामाविषय नस्ती लिपिका मार्फत सादर केल्यावर मुख्य लिपिक / उपलेखापाल यांचेकडुन तपासून प्रशासन अधिकारी / लेखाधिकारी, अतिरिक्त आरोग्य वैद्यकिय अधिकारी, आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचेकडुन मा.आयुक्त यांचे मान्यतेसाठी सादर केले जातात.

वैद्यकिय मुख्य कार्यालयाच्या अंतर्गत ७ रूग्णालये ३३ दवाखानेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरातील नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरविणे हा मूलभूत उद्देश लक्षात घेऊन त्या - त्या रूग्णालये व दवाखान्यामध्ये जेष्ठ / प्रभारी वैद्यकिय अधिकारी व त्यांच्या अंतर्गत असणा-या कर्मचारी वर्गाकडुन कामकाज केले जाते.

रूग्णालय व दवाखाने स्तरावरील कोणतीही अडचण अथवा प्रशासकिय कामाच्या नस्ती मुख्य कार्यालयाकडे सादर करून त्यांची अंतिम मान्यता आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत मा.आयुक्त सो.यांचेकडे सादर केले जाते.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ - धन्वंतरी स्वास्थ्य योजना विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील कायमस्वरुपी कार्यरत असणा-या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना (पती,पत्नी व २ अपत्ये २१ वर्षापर्यंत) वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात. तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांनाही या सुविधेचा लाभ दिला जातो.

सन्मा. नगरसदस्यांकरीता आरोग्य विमा योजना- आजी नगरसदस्य व शिक्षणमंडळातील सदस्या यांचेकरीता (पती,पत्नी व २ अपत्ये २१ वर्षापर्यंत) ५ लाख रकमेपर्यंत एक वर्ष कालावधीसाठी आरोग्य विमा योजना लागू करणेत आली आहे.